प्रभात

रविवार । दि. ३ ऑक्टोबर २०२१

# रयत शिक्षण संस्थेचा उद्या १०२ वा वर्धापनदिन

## उच्च शिक्षण मंत्री उदय सामंत यांची राहणार उपस्थिती

**सातारा, दि. २ (प्रतिनिधी)** - रयत शिक्षण संस्थेचा १०२ वा वर्धापनदिन सोमवार, दि. ४ ऑक्टोबर २०२१ रोजी रयत शिक्षण संस्थेच्या सर्व शाखांच्यावतीने साजरा करण्यात येणार आहे. हा वर्धापनदिन समारंभ सोमवारी सकाळी ११ वाजता यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स या महाविद्यालयात होणार आहे.

या समारंभास प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत हे उपस्थित राहणार आहेत. या समारंभाचे अध्यक्षस्थान रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन हे डॉ. अनिल पाटील भूषविणार असून संस्थेचे व्हाईस चेअरमन ॲड. भगीरथ शिंदे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

रयत शिक्षण संस्थेच्या या वर्धापन दिनाचे औचित्य साधून रयत शिक्षण संस्थेतील विशेष उल्लेखनीय कार्य करणारी महाविद्यालये व विशेष प्राविण्य मिळविणारे विद्यार्थी यांचा प्रातिनिधिकस्वरुपात सत्कार करण्यात येणार आहे.

कोविड -१९ च्या पार्श्वभूमीवर शासकीय नियमांचे पालन करीत निवडक मान्यवर, रयत सेवक व विद्यार्थी यांच्या उपस्थितीत हा समारंभ होणार असल्याचे रयत शिक्षण संस्थेचे सचिव प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर यांनी कळविले आहे.

ग्रंथपाल
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा. जि. सातारा.

प्राचार्य
छत्रपती शिवाजी कॉलेज,
सातारा